मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» बुधवार, दि. 23 जुलै 2025 | पान- 1

# आयुक्तसाहेब एमआयडीसीतील समस्या कधी सुटणार?

## करोडोमध्ये कर घेता मग सुविधा का देत नाही; उद्योजक, नागरिकांची नाराजी

**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

ठिकठिकाणी पडलेला कचरा... स्वच्छतागृहांची वाणवा...रस्त्यांची दुरावस्था... कामगारांची बस अभावी होणारी पायपीट...पार्किंग समस्या अशा एक ना अनेक समस्यांना एमआयडीसीतील उद्योजकांना सामोरे जावे लागत आहे. एमआय़डीसीमधून पिंपरी-चिंचवड महापालिकेस करोडो रूपयांचा कर जातो मात्र सुविधांची वाणवा कायम असल्याने उद्योजक, नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

एमआयडीसी मध्ये हजारो उद्योजक आहेत. लाखो कामगार याठिकाणी काम करतात. त्यामध्ये महिला कामगारांचेही मोठे प्रमाण आहे. सोयी-सुविधे अभावी महिला कामगारांचीही कुचंबना होते. रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे साचलेले ढीग, रस्त्यावर पडलेले मोठ-मोठे खड्डे, पार्किंग समस्या अशा विविध समस्या आहेत.



“ मागील वीस वर्षापासून संघटनेच्या माध्यमातून समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. हिंजवडी आयटी क्षेत्रात एक दिवस पाणी नाही आले तरी लक्ष देता. आयुक्तसाहेब दौरा करतात. मग एमआयडीसीकडे का दुर्लक्ष आहे.आयुक्तसाहेब यांना एमआयडीसीतील समस्येबद्दल वारंवार पाठपुरावा केला. मात्र काहीच झाले नाही. पालकमंत्र्यांनीच एमआयडीसीतील समस्यांकडे लक्ष देऊन दौरा करावा. त्यानंतर महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन सूचना कराव्यात. तेव्हाच एमआयडीसीतील प्रश्न सुटले जातील.

**- संदीप बेलसरे, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना अध्यक्ष.**

“ एमआयडीसीतील विविध समस्येमुळे कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. बंदास्थेतील स्वच्छतागृह, कचऱ्याचे ढीग,डासांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे आरोग्य समस्या मोठ्या आहेत. यासोबतच रस्त्यांची दुरावस्था गंभीर आहे. महापालिका आयुक्तांनी या समस्यांची पाहणी करून सोडवणे आवश्यक आहे.

**- निखील काळकुटे, युवा उद्योजक.**

“ एमआयडीसी माझ्या प्राभागात असल्याने उद्योजकांना किती समस्यांना सामोरे जावे लागते हे दिसते. याबाबत आयुक्तांनाही समस्या सोडवण्यासाठी बोललो आहोत. मात्र समस्या जैसे थे आहेत. महिला कामगारांची कुचंबना मोठ्या प्रमाणात होते. कचरा वेळेवर उचलला जात नाही. एमआयडीसीतील उद्योजक करोडो रूपयांचा कर भरतात. मग त्यांच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी आयुक्तांची आहे.

**- नम्रता लोंढे, माजी नगरसेविका.**

# आत्मविश्वास ठेवाल तर यश नक्की मिळेल : डॉ. दीपक शहा

## कमला एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिभा महाविद्यालयात नवागत विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

**पिंपरी | प्रतिनिधी**

कमला एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिभा महाविद्यालयात विविध शाखांमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांसाठी ‘इंडक्शन प्रोग्राम २०२५’ चे आयोजन उत्साहात करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी विद्यार्थ्यांना “आत्मविश्वास जागृत ठेवाल, तर यश तुमचं नक्कीच आहे” असे मार्गदर्शन करत प्रेरणादायी विचार मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दीपक शहा हे होते. त्यांच्यासोबत व्यासपीठावर संचालिका डॉ. तेजल शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, विभागप्रमुख डॉ. जयश्री मुळे, डॉ. अनामिका घोष, डॉ. हर्षिता वाच्छानी, प्रा. हेमलता चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

**सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रमांची रेलचेल**

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, प्रश्नमंजुषा, विविध गुणदर्शन, सायबर सिक्युरिटी व जनजागृती यासारख्या विविध विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. महाविद्यालयातील संस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण समिती आणि क्रीडा विभागाच्या वतीने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**प्रेरणादायी मार्गदर्शन**

विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना डॉ. दीपक शहा म्हणाले की, “परीक्षेतील गुण जितके महत्त्वाचे, तितकेच तुमचे व्यक्तिमत्त्व आणि कलागुणही महत्त्वाचे आहेत. ध्येय ठरवा आणि त्यासाठी दिवस-रात्र मेहनत करा. या तीन वर्षात मिळणारे संस्कार तुमच्या आयुष्याचा मजबूत पाया घालतील.” त्यांनी उत्तम संगती, वाचन आणि आत्मचिंतनाच्या महत्त्वावरही भर दिला.

प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी आणि डॉ. राजेंद्र कांकरिया यांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नेहा जैन यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जयश्री मुळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी डॉ. आनंद लुंकड, प्रा. रोहित अकोलकर, प्रा. ज्योती इंगळे, प्रा. कानंन पडते, प्रा. सुकलाल कुंभार, प्रा. सुप्रिया गायकवाड, संदीप शहा आदींनी विशेष परिश्रम घेतले.




### शिस्तीची शपथ व मिस्टर-मिस फ्रेशरचा गौरव

**» मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिस्तीची शपथ दिली. यावेळी ‘मिस्टर व मिस फ्रेशर’ स्पर्धेत क्षितिज रणसिंग (एफ.वाय. बी.कॉम. बी.एम.) व सानिया यादव (एफ.वाय. बी.एस्सी. ए.आय.) यांनी विजेतेपद पटकावले. त्यांच्या सन्मानाचा गौरव डॉ. क्षितिजा गांधी व डॉ. राजेंद्र कांकरिया यांच्या हस्ते करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. हनुमंत कोळी, डॉ. रूपा शहा, डॉ. अनामिका घोष, डॉ. दिनेश लाहोरी यांनी केले.**

# महानगरपालिकेत गणेशोत्सवाच्या बैठकीत गोंधळ

## एकाला काढले सभागृहाबाहेर; गणेश मंडळांचे कार्यकर्ते व पर्यावरणवाद्यांमध्ये बाचाबाची



**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाचे आयोजन व रूपरेषा ठरवण्यासाठी महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित बैठकीत सोमवारी (दि. 21) प्रचंड गोंधळ झाला. परवानगी नसताना या बैठकीत पर्यावरणवाद्यांनी त्यांची मते मांडल्याने गणेश मंडळांचे कार्यकर्ते चांगलेच भडकले. त्यांना बोलण्यास मनाई करूनही काही पर्यावरणवाद्यांनी बोलणे चालूच ठेवल्याने मंडळांचे कार्यकर्ते चांगलेच संतापले. त्यात एक पर्यावरणवादी हिंदीतून बोलू लागल्याने त्याला मराठीत बोलण्यास सांगूनही त्याने हिंदीतून बोलणे सुरूच ठेवल्याने कार्यकर्ते त्याच्यावर धावून गेले. यानंतर सुरक्षारक्षकांनी त्याला बाहेर काढल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले होते.

गणेशोत्सव अवघ्या एका महिन्यावर येऊन ठेपला आहे. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवाचे आयोजन, नियोजन व त्याची रूपरेषा ठरविण्याकरिता व उत्सव शांततेने, शिस्तीने व उत्साहात पार पाडण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, मनपा अधिकारी व पोलिस प्रशासन यांची संयुक्त बैठक महानगरपालिकेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केली होती.

या बैठकीला आयुक्त नवलकिशोर राम, झोन 1 चे डीसीपी ऋषीकेश रावळे, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे व पुण्यातील विविध गणेश मंडळांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी महानगर पालिकेच्या प्रशासनाला अनेक सूचना केल्या. वाहतूक नियोजन, स्वच्छता, पोलिस मदत कक्ष, मेट्रो आदी विषयांवर प्रश्न अधिकाऱ्यांना विचारण्यात आले. या बैठकीला काही पर्यावरणवादीदेखील उपस्थित होते.

त्यांनीदेखील या बैठकीत ध्वनिप्रदूषण, शाडूच्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तींचा वापर टाळावा याबाबत सूचना करण्यास सुरुवात केली. दरम्यान, ही बैठक केवळ गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसाठी आयोजित केल्याचे सांगून आम्हाला बोलण्यास संधी द्या, असे म्हणत त्यांनी त्यांना बोलण्यास विरोध केला. पर्यावरणवाद्यांनी माइक हातात घेऊन बोलण्यास सुरुवात केली. त्यामुळे गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांचा संताप अनावर झाला.

### गणेश मंडळांवर विचार लादण्याचा प्रयत्न

» झालेल्या गोंधळानंतर भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी बोलण्यास सुरुवात केली. घाटे म्हणाले, मुळात ही बैठक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसाठी असून त्यांना सभागृहात येण्याची परवानगी कशी मिळाली? हे लोक कुठून तरी येतात आणि या ठिकाणी आपले मत मांडून त्यांचे विचार गणेश मंडळांवर लादतात. हे कुठे तरी थांबले पाहिजे. प्रशासन आणि गणेश मंडळाचे कार्यकर्ते हातात हात घेऊन काम करत आहेत. ढोल ताशा पथकांनादेखील सरावासाठी जागा उपलब्ध करून दिली जात नाही. त्यामुळे प्रशासनाने यावर निर्णय घ्यावा, अशी मागणीदेखील घाटे यांनी या वेळी केली.

“ ही बैठक केवळ गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसाठी आयोजित केली होती. या बैठकीत इतर नागरिकदेखील सहभागी झाले. देशाचे नागरिक म्हणून त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. मात्र, यापुढे केवळ मंडळांच्या कार्यकर्त्यांसाठी ही बैठक घेतली जाईल तसेच तशी व्यवस्थादेखील करण्यात येईल.

**- नवलकिशोर राम, आयुक्त, महानगरपालिका.**

# गणेशोत्सवात पोलिसांकडून एकतर्फी निर्बंध नाहीत

## उत्सवासाठी गेल्या वर्षीची परवानगीही ग्राह्य धरली जाईल; अमितेश कुमार



**पुणे | प्रतिनिधी**

‘यंदाच्या गणेशोत्सवात पोलीस प्रशासनाकडून कोणतेही एकतर्फी निर्बंध लावण्यात येणार नाहीत,’ असे आश्वासन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. ‘उत्सवासाठी गेल्या वर्षीची परवानगीही ग्राह्य धरली जाईल. वेगळ्या पोलीस परवानगीची आवश्यकता नाही,’ असेही त्यांनी सांगितले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेचा पारिषोतिक वितरण समारंभ रविवारी झाला. त्या वेळी ते बोलत होते. जगद्गुरू कृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर, माजी आमदार उल्हास पवार, माजी महापौर अंकुश काकडे, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, दगडूशेठ गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस आणि आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह सुवर्णयुग तरुण मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भोसले मार्ग भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकाविला. तर, एरंडवण्यातील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने द्वितीय, नाना पेठेतील पोटसुळ्या मारुती मंडळाने तृतीय, नवी खडकी येरवडा येथील नवज्योत मित्र मंडळ ट्रस्टने चौथे तर भांडारकर रस्त्यावरील विनायक नवयुग मित्र मंडळाने पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. स्पर्धेत सहभागी झालेल्या १९४ मंडळे आणि शाळांपैकी १०६ मंडळे तसेच शाळांनी पारितोषिके मिळविली असून एकूण १४ लाख ९५ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष (१२५) साजरे करणारे मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष विकास पवार यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

अमितेश कुमार म्हणाले, ‘गेल्या वर्षी पहिल्यांदाच पुण्यात नियोजन केले. पुण्याच्या उत्सवाचे स्वरूप विशाल आहे. सामान्य नागरिक यामध्ये सहभाग घेतात. त्यामुळे यंदाचा बंदोबस्त हा सोयी-सुविधांनी युक्त असणार आहे. पोलीस प्रशासन उत्सवामध्ये कोणताही हस्तेक्षप करणार नाही. वाहतूक सुरळीत करण्यासाठीही विशेष नियोजन करण्यात येईल.’

उल्हास पवार म्हणाले, ‘संघटन आणि प्रबोधनानंतर जनआंदोलन उभे राहावे, ही गणेशोत्सवामागील लोकमान्यांची भूमिका होती. डीजे म्हणजे गणपती नाही. फार मोठा आवाज म्हणजे गणेशोत्सव नाही. आज उत्सवाचे रूप बदलले, तरीदेखील १०० वर्षांपूर्वी बँड हे गणपतीपुढे असायचे.’ ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.

### ‘दुसऱ्या दिवशी बाराच्या आत मिरवणूक संपवायला हवी’

» ‘यंदा अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी ग्रहण आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी दुपारी १२ च्या आत विसर्जन मिरवणूक संपवायला हवी. त्यामुळे यंदा मिरवणूक सकाळी १०.३० च्या ऐवजी दोन तास आधी सुरू व्हावी. आपण धार्मिक उत्सव साजरा करतो, त्यामुळे याबाबत विचार व्हायला हवा. दुसऱ्या दिवशी उशिरापर्यंत चालणारी मिरवणूक लवकर संपविणे गरजेचे आहे. यंदाच्या वर्षी अनंत चतुर्दशीला लवकर म्हणजेच दोन तास आधी मिरवणुकीत निघावे,’ अशी सूचना अण्णा थोरात यांनी केली.

# पिंपरी- चिंचवड शहरामध्ये खड्ड्यांचा त्रास

## शहरातील केवळ 804 खड्डे बुजविण्याचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला

**पुणे | प्रतिनिधी**

उद्योगनगरी, कामगार नगरी, मेट्रो सिटी, स्मार्ट सिटी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांवर सर्वत्र खड्डे झाले आहेत. अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली आहे. अवघ्या आठ दिवसांत ५८२ खड्डे आढळले आहेत. खड्ड्यांमुळे वाहतूक संथ होऊन कोंडीत भर पडत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात १२ फुटांपासून ८० फूट रुंदीचे रस्ते आहेत. शहरात पक्के, कच्चे असे दोन हजार ७३ किलोमीटर अंतराचे डांबरी, तसेच काँक्रीट रस्ते आहेत. यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली. जूनमध्येही चांगला पाऊस झाला. जुलैच्या पहिल्या आठवड्यातही संततधार सुरू होती. त्यामुळे शहरातील रस्त्यांची चाळण झाली. मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांवर खड्डे पडले. पिंपरी, चिंचवड, निगडी, रावेत, स्पाइन रोड, मोशी, भोसरी, नवी सांगवी, जुनी सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, आकुर्डी परिसरात रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. पुनावळे, ताथवडे, वाकड भागातून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्गाच्या सेवा रस्त्याचीही दुरवस्था झाली आहे.

गेल्या आठ दिवसांत शहरात ५८२ खड्डे आढळले आहेत. आतापर्यंत दोन हजार ५१७ खड्डे आढळले आहेत. त्यांपैकी महापालिकेने डांबर आणि कोल्ड मिक्सने ७८४, बीबीएमने ८२, खडीने ५६९, पेव्हिंग ब्लॉकने ३६, काँक्रीटने २४९ असे १७१३ खड्डे पूर्णतः बुजविले आहेत. त्याचे प्रमाण ६८.०६ टक्के आहे. शहरातील केवळ ८०४ खड्डे बुजविण्याचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

**निगडी ते आकुर्डी सेवा रस्ता धोकादायक**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर एकीकडे मेट्रो आणि दुसरीकडे जलवाहिनीच्या कामांमुळे दोन्ही बाजूंनी सेवा रस्त्याची खोदाई सुरू आहे. त्यामुळे बीआरटी मार्ग पूर्णतः बंद असून, रस्ता अतिशय अरुंद झाला आहे. त्यातच जड वाहतुकीमुळे निगडी ते आकुर्डी या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. तो अत्यंत धोकादायक बनला आहे. त्यातच पवळे पूल आणि आकुर्डीतील खंडोबा चौकात रिक्षा थांबत असल्याने वाहतुकीला अडथळा येत आहे. खड्डे, धूळ, वाहतूककोंडी आणि अपूर्ण कामामुळे येथे दररोजच छोटे-छोटे अपघात होतात. त्यातून हमरीतुमरी आणि वाहतूक संथ होणे नित्याचे बनले आहे. या भागात विद्यार्थ्यांना, पादचाऱ्यांना जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत आहे.

### खडीमुळे अपघाताचा धोका

» खड्ड्यांमध्ये साचणाऱ्या पाण्यामुळे चालकाला खड्ड्याचा अंदाज येत नाही. वाहन खड्ड्यात आदळून चालक आणि वाहन दोघांना दणका बसतो. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीवर दुचाकी घसरून अपघात होत आहेत. खड्ड्यांपासून बचावासाठी वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे.

### अभियंत्यांना देणार समज

» खड्ड्यांकडे, नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणे आणि खड्डे बुजविताना दर्जा न ठेवल्याप्रकरणी महापालिकेच्या २६ कनिष्ठ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांनी सादर केलेल्या खुलाशाची पडताळणी सुरू असून, त्यांना समज देण्यात येणार असल्याचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

“ पावसाळापूर्व कामे उन्हाळ्यातच केली होती. शहरातील खड्ड्यांची माहिती घेऊन ते तातडीने बुजविले जातात. रस्त्यावर पाणी साचल्यास, खड्डा आढळला, की तातडीने बुजविला जातो.

**– देवन्ना गट्टूवार, सहशहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पिंपरीत पहिल्या तिमाहीत 15 कोटींची पाणीपट्टी वसूल

## करसंकलन विभागाच्या कार्यपद्धतीमुळे वसुली अधिक प्रभावीपणे पार पडली

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत १५ कोटी ५३ लाख ११ हजार ७३० रुपयांची पाणीपट्टी वसूल करण्यात आली. त्यामध्ये सर्वाधिक सहा कोटी ५३ लाख ५ हजार १५९ एवढी रक्कम ऑनलाइन जमा झाली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ४५ लाखांची अधिक वसुली झाली आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक असे मिळून एक लाख ८० हजार ९०६ नळजोडधारक आहेत. त्यांच्याकडून विविध माध्यमांतून पाणीपट्टी भरली जात आहे. करसंकलन विभागाच्या कार्यपद्धतीमुळे ही वसुली अधिक प्रभावीपणे पार पडली. मात्र, अद्यापही ३२ हजार ४६० नळधारकांची पाणीपट्टी थकीत आहे. थकबाकीदारांनी लवकरात लवकर पाणीपट्टी भरावी, अन्यथा नळजोड खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे.

दरम्यान, ऑनलाइन माध्यमातून सर्वाधिक सहा कोटी ५३ लाख पाच हजार १५९, धनादेशाद्वारे पाच कोटी ९० लाख ९८ हजार ५८५, रोख स्वरूपात तीन कोटी नऊ लाख सात हजार ९८६ रुपये पाणीपट्टीचा भरणा झाला आहे.

### मीटर दुरुस्तीबाबत नोटीस

» पाणीपुरवठा विभागामार्फत ग्राहकांना नादुरुस्त अथवा बंद असलेले पाणीमीटर दुरुस्त करण्याबाबत लवकरच नोटीस देण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी पाणीमीटर नादुरुस्त असल्याने रीडिंग घेणे शक्य होत नाही. त्यामुळे देयकात अडचणी निर्माण होत आहेत. यासाठी नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन पाणीमीटर लवकरात लवकर दुरुस्त करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

“ मालमत्ताकरासोबत पाणीपट्टी वसूल करण्याचा निर्णय महसूलवाढीच्या दृष्टिकोनातून योग्य ठरला आहे. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेस सहकार्य करावे. अन्यथा थकबाकीदारांवर कारवाईशिवाय पर्याय नाही.

**– प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# ससून रुग्णालयात 'कोड पिंक' प्रणाली

## बालकांची चोरी रोखण्यासाठी आपत्कालीन लॉकडाऊन यंत्रणा कार्यान्वित




**पुणे | प्रतिनिधी**

रुग्णालयाच्या चार भिंतीआत घडणाऱ्या सर्वात भीषण गुन्ह्यांपैकी एक म्हणजे नवजात बालकांची चोरी.. यावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषधे विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पुण्यातील नामांकित ससून सर्वसाधारण रुग्णालयासह राज्यभरातील ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये आता 'कोड पिंक' ही आपत्कालीन लॉकडाऊन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

याचं उद्दिष्ट अगदी स्पष्ट आहे ते म्हणजे एखादे बाळ चोरी गेले, तर चोर पकडला गेला पाहिजे. रुग्णालयाच्या आवारातून बाहेर जाण्यापूर्वीच. यासाठी प्रत्येक प्रवेशद्वार बंद केले जाते, प्रत्येक व्यक्तीची तपासणी होते आणि प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो.

ससून रुग्णालयात ही यंत्रणा आता पूर्णपणे कार्यान्वित असून, ती 'कोड ब्लू' प्रणालीच्या धर्तीवर तयार करण्यात आली आहे. हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णासाठी कोड ब्लू जसे तत्काळ वैद्यकीय पथकाला सक्रिय करते, तसेच कोड पिंक संपूर्ण रुग्णालयाच्या सुरक्षा यंत्रणेला सज्ज करते.

**बाळांना चोरणाऱ्यांचे रस्ते आता बंद**

वैद्यकीय शिक्षण विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांने कोड पिंक यंत्रणेचे 'न चुकता, वेळेवर कृती करणारी आपत्कालीन प्रणाली' असे वर्णन केले. गेल्या काही वर्षांत काही सरकारी रुग्णालयांमध्ये झालेल्या बालक चोरीच्या घटनांमध्ये गर्दी, कर्मचारी अपुरी संख्या आणि जुनी यंत्रणा यामुळे चोरट्यांना सहज पळ काढता आला होता. ही चूक पुन्हा होऊ नये म्हणून ही व्यवस्था केली असल्याचे त्यांनी सांगितले.

ससून रुग्णालयाच्या बालरोग विभाग प्रमुख डॉ. आरती किणीकर म्हणाल्या, "कोड पिंक ही बालचोरी रोखण्यासाठीची एक अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी यंत्रणा आहे. केवळ प्रणाली असून चालत नाही, जनजागृतीसुद्धा तितकीच महत्त्वाची आहे."

**हे का महत्त्वाचे आहे?**

सार्वजनिक रुग्णालये विशेषतः ससूनसारखी मोठी आणि गरीब रुग्णसंख्येला सेवा देणारी ठिकाणे, बालक चोरांच्या दृष्टीने सॉफ्ट टार्गेट ठरतात. चोरटे परिचारक किंवा नातेवाईक असल्याचा सोंग घेत रुग्णालयात शिरतात आणि बाळं चोरी करतात. अनेकदा ही घटना तासांनी उशिरा लक्षात येते, तोपर्यंत सर्व पुरावे आणि चोराचा माग जमत नाही. पण आता कोड पिंक प्रणालीमुळे बाळ हरवल्याचं समजल्याच्या क्षणापासून वेळ मोजणं सुरू होतं. आणि रुग्णालय किल्ल्यासारखं बंद होतं. त्यामुळे चोरट्याच्या पळून जाण्याची शक्यता जवळजवळ शून्यावर येते.

### ही यंत्रणा कशी कार्य करते?

» जर प्रसूती कक्ष, बाळंत खोली किंवा नवजात रुग्ण कक्षातून एखादं बाळ गायब झालं, तर "पॅनिक बटण" दाबलं जातं. ही घटना रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या लक्षात आली किंवा नातेवाइकांनी दिलेल्या माहितीवरून समजली, की उपस्थित परिचारिका आणि वार्ड इन्चार्ज तात्काळ खात्री करून घेतात. नंतर रुग्णालय अधीक्षकाला माहिती दिली जाते. अधीक्षक तत्काळ 'कोड पिंक'ची घोषणा सार्वजनिक प्रसारण यंत्रणेवर करतो. आणि त्या क्षणापासून, संपूर्ण रुग्णालयात यंत्रणा सक्रिय होते. सर्व प्रवेशद्वारे तत्काळ बंद केली जातात. सुरक्षारक्षक संपूर्ण रुग्णालयभर पसरतात, बॅग्स तपासतात, लोकांची चौकशी करतात, प्रत्येक कोपरा शोधतात. सीसीटीव्ही फुटेज लगेच तपासलं जातं, पोलिसांना त्वरित कळवले जाते. कोणताही कागदोपत्री वेळ बाळाचा शोध घेणे आणि चोराला पकडणे हे मुख्य ध्येय समोर ठेवून काम केले जाते. बाळ सापडल्यानंतरच 'कोड पिंक ऑल क्लिअर' घोषित केले जाते आणि लॉकडाऊन उठवला जातो. तोपर्यंत कोणालाही बाहेर जाण्याची किंवा आत येण्याची परवानगी नसते.

# भाटघर धरणातील पाण्याला आला पोपटी रंग

## मागील चार-पाच दिवसांपासून धरणातील पाण्याला पोपटी रंग दिसू लागला



**पुणे | प्रतिनिधी**

भाटघर धरणातील पाण्याला पोपटी रंग आल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील चार-पाच दिवसांपासून धरणातील पाण्याला पोपटी रंग दिसू लागला आहे.

मासेमारी करणाऱ्यांकडून माशांना खाद्य टाकल्यावर त्यातील नायट्रोजनचा थर पाणी शांत झाल्यावर काठावर येत असतो, त्यामुळे पाण्याचा रंग बदलतो. याबाबत जलसंपदा विभागास पत्रव्यवहार केला असल्याचे पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता योगेश भंडवलकर यांनी सांगितले.

धरणाच्या भिंतीच्या उत्तरेकडील बाजूला आणि उत्तरेकडील गावांच्या किनाऱ्यावर पाण्याचा रंग पोपटी दिसत आहे. सकाळी पोपटी रंगाचा तवंग दिसतो आणि दुपारपर्यंत तसाच राहतो. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील संगमनेर, माळवाडी व न-हे गावांच्या लगतच्या जलसाठ्यात हा बदल स्पष्टपणे दिसून येत आहे.

धरणाच्या पाण्यावर भोर शहरासह अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना आहेत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. भाटघर धरणात मत्स्यसंवर्धन करण्यासाठी काही व्यावसायिकांना परवानगी दिली आहे. हे व्यावसायिक माशांना टाकत असलेल्या खाद्यामुळे पाण्याला पोपटी रंग येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

याबाबत जलसंपदा विभागाचे शाखा अभियंता गणेश ठेंगळे यांनी सांगितले की, माशांना टाकण्यात येत असलेल्या खाद्यांमध्ये नायट्रोजनचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पाण्यात शेवाळ वाढण्याची प्रक्रिया वेगाने होते. पाणी शांत असल्यावर ते किनाऱ्याला येते. पाण्याच्या लाटा आणि पावसाचे प्रमाण वाढल्यानंतर शेवाळ साठत नाही. त्यामुळे दुपारनंतर धरणातील पाणी नेहमीप्रमाणे स्वच्छ दिसते.

> शासनाच्या नियमानुसार भाटघर येथे 15 ते 16 व्यावसायिकांना पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन करण्याची परवानगी दिली आहे. माश्यांसाठी टाकलेल्या खाद्यामुळे युट्रोफिकेशन होऊन पाण्याचा रंग पोपटी होतो. पाण्याला पोपटी रंग येण्यासाठी या एका कारणाशिवाय आणखी इतरही कारणे असतात. आम्ही या कारणांचा शोध घेण्याचे काम सुरू केले असून, पाण्याचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवणार आहे.
>
> **- अर्चना शिंदे, सहायक आयुक्त, मत्स्य व्यवसाय, पुणे.**